CMYK



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

गणपती बाप्पा मोरया

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १ सप्टेंबर २०२२ | वर्ष : २० वे | अंक : ३३३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# चोरट्यांचा कळस

## मश्रुम गणपती मंदिरावरील सोन्याच्या कळसाची दुसऱ्यांदा चोरी



सुराज्य/सोलापूर

**कोरोनाच्या निर्गमनानंतर पहिल्यांदाच होत असलेला गणेशोत्सव, त्या पार्श्वभूमीवर गणेशभक्तांनी गणेशागमनाची केलेली जोरदार तयारी, घरोघरी सजलेले देव्हारे, चौकाचौकात सार्वजनिक मंडळांचे थाटलेले मंडप, सगळेच बुधवारी होणाऱ्या गणेशागमनासाठी उत्सुक, अशातच सर्वांचा विघ्नहर्ता असणाऱ्या गणेशाच्या मंदिरावरच विघ्न आले. चोरट्यांनी चोरीचा कळस केला. तुळजापूर रोडवरील तळे हिप्परगा (ता.उत्तर सोलापूर) येथे असलेल्या मश्रुम गणपती मंदिरावरचा सोन्याचा कळसच गणेशागमनाच्या अगोदर सूर्योदयापूर्वीच दुसऱ्यांदा कापून नेला आणि संपूर्ण सोलापुरातील गणेशभक्तांवर निराशा पसरली.**

हा प्रकार बुधवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आला. सोलापूरपासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर तुळजापूर रोडवर असलेल्या तळेहिप्परगा येथे मश्रुम गणपतींचे मंदिर आहे. मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास नेहमीप्रमाणे मंदिराचे पुजारी संजय किसनराव पतंगे यांनी मंदिर बंद केले होते. बुधवारी पहाटे संजय पतंगे पूजेसाठी आले. मंदिरात जाण्यापूर्वी ते कळसाचे दर्शन घेतात.

बुधवारी पहाटे दर्शन घेण्यासाठी त्यांनी कळसाकडे पाहिले; तेव्हा शिखरावर सोन्याचा कळस नव्हता. तो कोणी तरी चोरून नेला होता. त्यानंतर त्यांनी तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधून हा प्रकार सांगितला. याप्रकरणी त्यांच्याच फिर्यादीवरून तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुध्द सोन्याचा मुलामा असणाऱ्या कळसाच्या चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### झाडावरून चोरटे चढले होते मंदिरावर

दि. २० जुलै २०१६ रोजी याच मंदिरावरील सोन्याच्या कळसाची चोरी झाली होती. पूर्वी मंदिराशेजारी लिंबाचे झाड होते. त्या झाडावर चढून चोरटे मंदिराच्या कळसापर्यंत पोहचले होते. कळस घेऊन जाताना झाडाची फांदी तुटून पत्र्यावर पडली होती. शिवाय त्या पत्र्यावर चोरट्यांच्या पावलांचे ठसेही उमटले होते. त्यावेळी पोलिसांनी शंकर बापू कांबळे, उषा बाळू काळे आणि रमेश श्रीराम दग्गू यांना अटक करून त्यांच्याकडून सोन्याचा कळस हस्तगत केला होता.

### सिध्दरामेश्वर स्थापित गणपती

सोलापूरचे ग्रामदैवत शिवयोगी सिध्दरामेश्वर महाराज यांनी सोलापूर अर्थात सोन्नलीगीच्या रक्षणासाठी सोलापूर शहर परिसरात अष्टविनायकांची स्थापना केली आहे. त्यापैकीच मश्रुम गणपती हा आठवा गणपती आहे. सिध्दरामेश्वर स्थापित हा गणपती असल्यामुळे सोलापूर आणि परिसरातील भक्ताची या गणपतीवर श्रध्दा आहे. त्यामुळे दर्शनासाठी नेहमीच या मंदिरात भाविकांची गर्दी असते.

### दुसऱ्यांदा चोरी

चोरीस गेलेला हा कळस २५ किलो वजनाचा असून त्यावर २८ तोळे सोन्याचा मुलामा करण्यात आला होता. यापूर्वी २० जुलै २०१६ रोजी याच मंदिरावरील सोन्याचा कळस अशाच पध्दतीने चोरीला गेला होता. तो हैद्राबादचे शिवा सराफ यांच्याकडून बनवून घेतला होता. त्यावेळी पोलिसांनी चोरट्यांना शोधून काढले होते. त्यानंतर नव्याने बनवलेला कळस बसवण्यात आला होता. त्याच कळसाची आता चोरी झाली आहे.

### श्वान मंदिर परिसरातच घुटमळले

अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक नामदेव शिंदे यांनी घटनास्थळाला भेट दिली. पोलिसांच्या श्वानपथकाला पाचारण करण्यात आले होते; पण ते मंदिर परिसरातच घुटमळले आहे. लवकरात लवकर तपास करून आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात येईल, असे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी यावेळी सांगितले.



### आगमन गणरायाचे

श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाच्यावतीने शिस्तबध्दतीने लेझीम सादर करून गणरायाचे स्वागत करण्यात आले.

## हद्दपार आरोपीचा पाकणीजवळ खून, परभणीतील दहा जणांवर गुन्हा दाखल

**मोहोळ** : मुंबईहुन चेन्नईकडे ऑइलचा टँकर घेऊन जात असताना पाकणी पाटीजवळ टँकर च्या केबीन मध्येच नाका तोंडावर उशीने दाबून खून करण्यात आला असल्याची घटना उघड झाली असून याबाबत दहा जणांच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हद्दपार आरोपी माधव ऊर्फ शेंडया दिगंबर सानप (वय ३२ रा. सैलहोमा ता. गंगाखेड जि. परभणी) असे मयताचे नाव आहे.


माधव ऊर्फ शेंडया दिगंबर सानप (वय ३२ रा सैलहोमा ता गंगाखेड जि परभणी) हा परभणी, बीड, लातूर या तीन जिल्ह्यांतून हद्दपार होता. सध्या कांजगाव (ता. पनवेल जि. रायगड) येथे रहात होता. २८ ऑगस्ट रोजी माधव ऊर्फ शेड्या सानप हा मुंबईहुन चेन्नई कडे ऑइलचा टँकर नं एम एच ० ४ के. एफ. ३७०७ हा घेऊन जात असताना पाकणी पाटीजवळ त्याचा टँकर सोलापूरच्या दिशेने तोंड करून उभा असताना केबीनमध्ये त्याचा मृतदेह आढळून आला. ही घटना दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास दिसून आली. याची खबर मयताचा भाऊ राहुल दिगंबर सानप यास मिळताच त्याने मुंबई वरून येऊन घटनेची माहिती घेऊन त्याचा मृत्यू हा त्याच्या नाका तोंडावर उशी दाबून गुदमरून झाला असल्याने मोहोळ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. याप्रकरणी मंगेश शिवाजी मुंढे, लक्ष्मण मुरलीधर मुंढे, श्रीकांत जनार्धन मुंढे, मनोहर रामराव मुंढे, शिवाजी बाबूराव मुंढे, जनार्दन रामराव मुंढे, डॉ. सूर्यकांत बाबू मुंढे (रा. सर्वजण सैलहोमा ता गंगाखेड जि परभणी) या दहा जणांविरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## समाधाननगरात संशयास्पद मृत्यू

**अक्कलकोट** : अक्कलकोट रोड परिसरातील समाधान नगरात संजय हनुमंत संक (वय ५०) या इसमाचा मृतदेह बादलीतील पाण्यात डोके बुडालेल्या अवस्थेत आढळून आला. ही घटना आज बुधवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. संजय संक हा घरात एकटाच राहत होता. घराचा दरवाजाआतून बंद होता. पोलिसांनी दरवाजा उचकटून आत गेले असता त्याचा मृतदेह बाथरूम जवळच्या बादलीतील पाण्यात डोके बुडवलेल्या अवस्थेत आढळून आला.त्याने आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज पोलिसांचा आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, खूप रिक्रेस्ट येऊन पडल्यात!!

| कल्याण |
| --- |
| 290-18-260 |

| मेन बाजार |
| --- |
| 247-38-170 |

## भारताची सुपर-४ मध्ये धडक; हाँगकाँगचा ४० धावांनी पराभव

### सूर्यकुमार यादव आणि विराट कोहलीची दमदार फलंदाजी

**दुबई** : तडाखेबाज फलंदाजी आणि त्यानंतर भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारतानं हाँगकाँगला ४० धावांनी पराभूत केलंय. या विजयासह भारतानं आशिया चषकाच्या सुपर-४ मध्ये धडक दिलीय. या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आलेल्या भारतीय संघानं २० षटकात दोन विकेट्स गमावून हाँगकाँगसमोर १९३ धावांचं लक्ष्य ठेवलं. प्रत्युत्तरात हाँगकाँगच्या संघाला २० षटकात १५२ धावापर्यंत मजल मारता आली.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं आशिया चषक २०२२ मध्ये 'अ' गटातील दुसऱ्या सामन्यात हाँगकाँगचा ४० धावांनी पराभव केला. या स्पर्धेतील भारताचा हा सलग दुसरा विजय आहे. भारतानं हाँगकाँगसमोर १९३ धावांचे लक्ष्य ठेवलं होतं. प्रत्युत्तरात हाँगकाँग २० षटकांत ५ विकेट गमावून १५२ धावाच करू शकला.






विसर्जनाची सेल्फी 'सुराज्य'च्या अंकात...

Go Green with Ecofriendly Ganesh ही मोहीम घराघरात पोहोचली आणि अवघा गणेशोत्सव इकोफ्रेंडली बनला. लाडक्या बाप्पाचे उद्यापासून (दीड दिवस) विसर्जन सुरु होईल ते अनंत चतुर्दशी पर्यंत! आपल्या घरातील लाडक्या बाप्पाचे घराच्या दारात, अंगणात, टेरेसवर जेव्हा विसर्जन कराल तेव्हा या क्षणाची 'सेल्फी' घ्यायला विसरु नका!

ही सेल्फी सुराज्यला व्हॉटस्अप किंवा इमेलवर पाठवा!

सोबत आपले नाव आणि पत्ता आवर्जुन द्या...
आपला हा सुंदर आठवणीचा सेल्फी सुराज्यच्या अंकात प्रसिद्ध होईल.

WhatsApp

8975768353 | 8975768352 | 9011466100 | 8888818448
8975768349 | 7775956817

Email : timemarathi@gmail.com

CMYK